# पोलीस अधीक्षक कार्यालय बुलढाणा

पोलीस मुख्यालय बुलढाणा प्रभा हॉल येथे मा. अपर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी यांचे अध्यक्षतेखाली कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील, पो.नि. नरेंद्र ठाकरे बुलढाणा शहर, पो.नि. गजानन कांबळे बुलढाणा ग्रामीण, बुलढाणा शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील, पोलीस अंमलदार, शांतता समिती सदस्य, पत्रकार बांधव तसेच नागरिक हे सदर कार्यशाळेस उपस्तीत होते. सरकारी वकील श्री. सवडतकर, सरकारी वकील सत्र न्यायालय श्रीमती सावजी व श्रीमती बावणे यांचे मार्गदर्शनात नवीन कायदे भारतीय न्याय संहिता- 2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता- 2023 आणि भारतीय साक्ष अधिनियम, 2023 तसेच I.T. Act, सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर व महिला संबंधी घडणारे अपराधा संबंधाने घ्यावयाची दक्षता, तसेच पोक्सो कायद्या अंतर्गत माहीती देऊन जागृती करण्यात आली.

सध्या समाजामध्ये सोशल मीडिया व इतर प्रसार माध्यमांद्वारे सुरू असलेल्या अराजकतेबाबत सतर्क राहून आपणाकडून कायद्याचे कुठलेही उल्लंघन होणार नाही व अशा घटनांपासून स्वतःचा बचाव कसा करावा पोलिसांची व विधी सल्लागार यांची मदत कशी घ्यावी तसेच कायदेशीर मार्गदर्शन कसे प्राप्त करावे याबाबत उपस्तीत मान्यवरांकडुण मार्गदर्शन करण्यात आले.




स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०